# महाराष्ट्र मंडळ कॅन्सस सिटी

दि: ३१ – मे – २००३

महाराष्ट्र मंडळाच्या नवीन कार्यकारिणीतर्फे आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा. यंदापासून आम्ही हे "ई–पत्र" सुरु करत आहोत. ह्या पत्रकाद्वारे आपल्या सगळ्यांना झालेल्या व आगामी कार्यक्रमांची माहिती केव्हाही व कुठूनही कंप्यूटरवर वाचता येईल.

आपला गुढीपाडव्याचा कार्यक्रम अगदी पारंपारिक पद्धतीने साजरा झाला. ह्या वेळी अस्सल मराठमोळा जेवणाचा बेत होता. वैशिष्ट्य असे की सर्व वयोगटातील सभासदांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करुन समारंभाची रंगत वाढवली. २ ते ६ या वयोगटातील मुलांनी "असावा सुंदर चॉकलेटचा बंगला" ह्या बालगीतावर नृत्य केले. ६ ते ९ ह्या वयोगटातील मुलांनी "ससा तो कसा की कापुस जसा" हे गाणे सादर केले. सश्याच्या वेशातील मुलांनी खूपच मेहनतीने हे गाणे सादर केले व प्रेक्षकांची प्रशंसा मिळवली.
युवक सभासदांनी "मला काही सांगायचे आहे" ह्या सदराखाली आपले विचार मांडले. अतिशय विचारपूर्वक आणि मुद्देसूद भाषणांने प्रेक्षक थक्क झाले.
सालाबादाप्रमाणे नवीन सभासदांनी स्वतःची ओळख करुन दिली. आपले मराठी मंडळ कसे स्थापन झाले हे सांगणारे भारूड सादर करण्यात आले. भोजनानंतर हौषी कलाकारांनी पु. ल. देशपांडे लिखित "सारं कसं शांत शांत" ही एकांकिका सादर केली. प्रेक्षकांच्या हशा व टाळ्यांनी कार्यक्रम खूपच रंगला. शेवटी कार्यकारी समितीचे आभार मानून कार्यक्रम संपला. हा कार्यक्रम यशस्वी व्हायला सर्व कलाकारांबरोबर आपल्या सर्वांचा सहभागही तितकाच महत्वाचा होता.

आता वाट पुढच्या कार्यक्रमाची –> मंडळी ७ जूनला "सहलीला" नक्की यायचे बरंका !!

सहलीची माहिती पुढील पानावर :

Date: June 7, 2003
Time: 4:00 p.m. to 9:00 p.m.
Venue: Heritage Park
Shelter: 2

Directions from I-69
On I-69 south, take 151st street exit, take right on 151st street and keep going west 3 miles, take left on Pflumm and keep going south. After 159th intersection, you will see the park entrance on your right. Follow directions for shelter #2.

Directions from I-35
On I-35 south, take exit# 215. Go straight through first traffic lights. Take left on second traffic light. You will be on 151st street. Keep going east 3 miles. Take right on Blackbob, keep going south. Blackbob becomes Lackman after 159th st.
After 159th intersection, you will see the park entrance on your left. Follow directions for shelter #2.

We will have games at the picnic and refreshments will be provided.

---

## MMKC Board Members

| | |
|---|---|
| Sandeep Rao | President |
| Abhaya Kulkarni | Treasurer |
| Prasanna Joglekar | BMM Coordinator |
| Girish Pednekar | Program Coordinator |
| Sonali Joshi | Web Site |
| Miti Pandit | Kitchen Coordination |
| Sadhana Palnitkar | E-Patrak |
| Seema Lokre | Email |
| Nitin Kadam | Music System |
| Kalpana Nimkar | Program Coordinator/New members recruitment |

**सौ. कल्पना निमकर लिखित भारुड:**

बाईसाहेबांच्या विनंतीला देते मी मान
अहो मागचे तुम्ही, बडबड बंद करा आणि इकडे करा कान

गोष्ट गेल्या दशकातली I mean nineteen ninty
Thanks to a new profession called IT

Overland Park मध्ये जमू लागले खूप मराठी
देश सोडला पोटासाठी आणि तळ गाठली Kansas city

आणि बरं का सर्वांना एक गोष्ट समजून चुकली
ती कुठली ??
County त County Johnson County.
Where marathi population is large and plenty

तेव्हा, मंडळी अमेरिकेत आली, रूटीन मध्ये रंगली
अहो जॉब मध्ये तर खूपच दंगली

मात्र आठवण येई मुंबईची आणि पुण्याची
मराठी जेवणाची अन् मराठी गाण्यांची

मग काय, पंच्याण्णव साली गंमत झाली
मंडळी एकमेकांना म्हणू लागली

"मित्र मंडळी वाढू लागली. घरं छोटी पडू लागली"

" Folks Let's have a ball, why don't we
get together in a big hall?"

"अरे सर्वजण एकत्र जमूया, गप्पाटप्पा जोरात मारूया
करूया मस्ती करूया दंगल, खाण्यापिण्याची उडवूया चंगळ"

"Wait a minute.. Why don't we form a Marathi Mandal ?"

काय मंडळ ? अरे वा मंडळ !
अच्छा मंडळ ! इश्श मंडळ !

मंडळ होणार मंडळ होणार वाजू लागला डंका
एका मराठी मनात आली छोटीशी शंका
"जरा थांबा थांबा, आलाय छोटासा वांधा"
"ए मारू नकोस तू फांदा"
"अरे अध्यक्षपदासाठी लीडर नको का खंदा ?"
"अरे आहेत ना, शुक्रे, आपले अरविंद न् मंदा"

मंडळींना आले बळ अरविंदना घालू लागले गळ
अरविंद म्हणाले "Will do .. Will do ..."
मंडळी म्हणाली "Thank you.. Thank you...'

आता भरू लागला रंग, मंडळींनी बांधला चंग
आणि Planning मध्ये झाले दंग

मुहूर्त साधला गुढी पाडवा
एकच उद्देश - मराठीपण जपा, मराठीपण वाढवा

तेव्हा १९८५ साली मंडळाची गुढी उभारली
अशा तऱ्हेने कॅन्सास सिटी मराठी मंडळाची स्थापना झाली....

☺

☺ Special Thanks to Prasanna Joglekar for handwriting the "*Bharud*"

सदस्यांचे मनोगत:

नमस्कार मित्रहो

प्रपंचामधे आपण काही वेळेला इतके गुरफटलेलो असतो की काही गोष्टींचा आपल्याला विसर पडण्याची शक्यता असते. अशा गोष्टींची थोडी आठवण करुन देण्याचा हा छोटासा प्रयत्न.

भारतीय या नात्याने आपल्यावर, मुख्यतः खाली नमुद केल्या प्रमाणे काही ऋण आहेत

१. देवाचे ऋण
२. आई वडिलांचे ऋण
३. मातृभुमिचे ऋण
४. कर्मभुमिचे ऋण
५. शिवाजी महाराजांचे ऋण

पहीले ४ ऋण आपपल्या परीने कमी करण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करीत असालच. मला जे इथे सांगायचे आहे ते शिवाजी महाराजांच्या ऋणा बद्दल.

शिवाजी महाराजांचे ऋण मी यासाठी म्हणतो की या राजामुळे आज आपण हिंदु राहिलो आहोत व आज आपला हिंदु धर्म टिकून आहे. मी यासोबत महाराजांचा फोटो व रायगडावर त्यांचे जेथे सिंहासन होते त्याचा फोटो पाठवित आहे. कृपया हे फोटो आपल्या घरात फ्रेम करुन ठेवावे व रोज थोडा वेळ काढून महाराजांचे स्मरण करावे.

भारतात गेलात की रायगडाला जरुर भेट द्या जेथे महाराजांची राजधानी होती व तेथेच त्यांची समाधि पण आहे. आता रोप-वे झाल्यामुळे गडावर जाणं सोपं झालं आहे. गाइडची सेवा पण तेथे ऊपलब्ध आहे. तो तुम्हाला सगळी महत्वाची स्थळं आनंदाने दाखविल. गडावरिल परिसर अत्यंत रमणीय आहे.

समर्थ रामदास स्वामिंनी शिवाजी महाराजांचं वर्णन या प्रमाणे केलं आहे.

" निश्चयाचा महामेरु, बहुतजनांसी आधारु, अखंड स्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी
या भुमंडलाचे ठायी धर्मरक्षी ऐसा नाही, महाराष्ट्र धर्म राहिला काही तुम्हा कारणे"

बरय! धन्यवाद.

अरविंद शुके



